October - 2021 (07)

10 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

# केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

## नमुनापत्र - ३

## माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

मिरा भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 07 मा. अ.
दिनांक : 11/10/2021

प्रति,
शासकिय माहिती अधिकारी,
विधी विभाग
मिरा भाईंदर मनपा

१) अर्जदाराचे नाव :- संजय शांताराम साळवी

२) पत्ता :- 81 मंगलमुर्ती अपार्ट जवधर मांडवीपुर्वी

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :- शिवशक्ती नगर मधील सेंट ॲग्नेस व सेंट अपोलियन शाळेबाबत...

(एक) माहितीचा विषय :- सदर शाळेच्या अनाधिकृत बांधकामाबाबत

(दोन) माहितीशी संबधित कालावधी :- 2020-21

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :- शिवशक्ती नगर जवधर येथील CRZ व ND बाधीत जागेमध्ये सेंट ॲग्नेस शाळा व सेंट अपोलियन शाळेचे G+1 बांधकाम अनाधिकृत असून त्यावर सदर शाळा मालकाने न्यायालयाने स्टेटस्को घेतला होता तो स्टेटस्को अजुन सदर बांधकामावर आहे की नाही याची माहिती मिळावी व प्रत मिळावी

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) :- स्वत:

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) :- —

(सहा) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :- सदर जागा CRZ व ND बाधीत आहे.

Jadhav
Yee
11/10

ठिकाण :- भाईंदर

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

9594244211

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०७/२०२१-२२
दि. ०८/११/२०२१

प्रति,

श्री. संजय शांताराम साळवी
एस/१, मंगलमुर्ती को. ऑ. हौ. सो.
एन. के. जी. एस. बी. बँके समोर,
नवघर रोड, भाईंदर (पु)

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ** :- आपला (प्राप्त दि. ११/१०/२०२१) रोजीचा अर्ज.

महोदय,

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण सेंट ॲग्नेस शाळा व सेंट अपोलियन शाळेच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांची सद्यस्थितीची माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास सदरची माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

१) मौजे खारी, सं. क्र. १९३ हि. क्र. २ या जागेवरील सेंट. अँन्जेल इग्लिश हायस्कूलच्या बांधकामाबाबत वादी अरुणोदय चॅरिटेबल ॲण्ड एज्युकेशन ट्रस्ट यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे दावा क्र. स्पे. सी. सुट. ४६८/२०१७ दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदरचा दावा वादी यांनी मागे घेतला असून त्यामधील अपिल क्र. १६९/२०१७ मा. जिल्हा न्यायालयाने दि. १६/८/२०१८ रोजी निकाली काढलेला आहे.

२) मौजे खारी, सं. क्र. १९३ हि. क्र. २ या जागेवरील बांधकामाबाबत वादी सेंट ॲग्नेस इंग्लिश हायस्कूल यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे नव्याने दावा क्र. आर. सी. एस. ७८०/२०१८ दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे.सदर दाव्यात मा. न्यायालयाने जैसे थे आदेश पारीत केले असल्याचे ॲड. प्रशांत कोरगावकर यांनी दि. २७/७/२०१८ रोजी कळविले आहे. सदरचे जैसे थे आदेश मा. न्यायालयाने वेळोवेळी वाढवून दिलेले असून सदर दाव्यात वादी यांनी दाखल केलेल्या तात्पुर्त्या मनाई हुकुमाच्या निशाणी क्र. ५ च्या सुनावणीकरीता सदरचा दावा प्रलंबित आहे. तसेच दाव्याची पुढील तारीख दि. १५/११/२०२१ रोजी आहे.

३) मौजे खारी, सं. क्र. १९० जुना, ७२ नविन, हि. क्र. ९/बी व ८/अे या जागेवरील सेंट अपोलोनिस कॉन्व्हेंट इंग्लिश स्कूलवरील सौरउर्जा प्लांटबाबत वादी श्री. ॲन्थोनी बस्त्याव परेरा यांनी मा. न्यायालय, ठाणे येथे आर. सी. एस. ४४२/२०१७ दावा दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले आहे. सदर दाव्यात मा. न्यायालयाने जैसे थे

आदेश दिलेले आहेत. सदर दाव्यात वादी यांनी दाखल केलेल्या तात्पुर्त्या मनाई हुकुमाच्या निशाणी क्र. ५ च्या सुनावणीकरीता सदरचा दावा प्रलंबित आहे. तसेच दाव्याची पुढील तारीख दि. ०२/१२/२०२१ रोजी आहे.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. मारुती गायकवाड, मा. प्रथम अपिलीय अधिकारी, मा. उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Vwenadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\mbmc\Desktop\D Data\MAHITI ADHIKAR\Sanjay Salvi.docx